**ठळक बातम्या**

- केंद्र सरकार तंत्रज्ञानाच्या आधारे प्रशासनाचा विस्तार करत असल्यानंच देश वेगानं प्रगती करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्ने चार दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी मुंबईत दाखल

- चौथं विश्व मराठी साहित्य संमेलन नाशिकमधे सुरु /कृत्रिम बुध्दीमतेसह अनेक प्रकारची आव्हानं असूनही अभिजात मराठी टिकूनच राहील, असा मुख्यमंत्र्यांचा उद्घाटनपर भाषणात विश्वास

- उत्पादन शुल्क घोटाळ्यात दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया दोषमुक्त

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये ९६१ अंकांची घसरण

**<><><><><>**

व्यवसायात सुलभता आणून केंद्र सरकार तंत्रज्ञानाच्या आधारे प्रशासनाचा विस्तार करत असून त्यामुळेच देश वेगाने प्रगती करत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. विकसित भारतासाठी तंत्रज्ञान, सुधारणा आणि निधीची तरतूद या विषयावर आयोजित अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करत होते. ही गती टिकून राहावी यासाठी फक्त धोरणात्मक निर्णय न घेता त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यावरही भर द्यायला हवा, असं ते म्हणाले. देशातल्या विविध उद्योगांनी नवोन्मेषाच्या संकल्पनामधे गुंतवणुकीसाठी पुढे यावं, असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी केलं. अर्थसंकल्पाचं मूल्यमापन अनेकदा वेगवेगळ्या निकषांवर केलं जातं, पण, राष्ट्रीय अर्थसंकल्प हे अल्पकालीन अंदाजपत्रक नसून तो विकासाचा धोरणात्मक आराखडा आहे, असं ते म्हणाले.

**- - होल्ड... बाईट - प्रधानमंत्री - - -**

कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन आणि डेटा ॲनालिटिक्सचा व्यापक वापर करून पारदर्शकता, वेग आणि जबाबदारी वाढवायला असंही मोदी यांनी अधोरेखित केलं. गेल्या

दशकभरात सरकारने पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित केलं असून हा निर्णय विचारपूर्वक घेतल्याचं ते म्हणाले. महामार्ग, रेल्वे, बंदरे, डिजिटल नेटवर्क, उर्जा प्रणाली यांसारख्या ठोस माध्यमांची निर्मिती हा भारताच्या विकासाचा पाया ठरेल, असं मोदी यावेळी म्हणाले. सरकारी भांडवली खर्चात सातत्याने वाढ होत असून ११ वर्षांपूर्वी फक्त २ लाख कोटी इतका असलेला हा खर्च यंदा १२ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली.

<><><><><>

कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्ने आजपासून चार दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी मुंबईत पोचले. विमानतळावर राज्य सरकारचे राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी कार्ने यांचं स्वागत केलं. आजपासून दोन दिवस ते विविध कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी, उद्योजक, अर्थतज्ज्ञ, नवोन्मेषकर्मी, तसंच शिक्षणतज्ज्ञ यांच्या भेटी घेणार आहेत. 1 मार्चला ते नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतील. उभय नेते भारत आणि कॅनडादरम्यानच्या धोरणात्मक भागीदारीचा आढावा घेतील तसंच, व्यापार आणि गुंतवणूक, ऊर्जा, मौल्यवान खनिजं, कृषि, शिक्षण, आणि संशोधन क्षेत्रात परस्पर सहकार्याच्या संधीबाबत चर्चा करतील. मार्क कार्ने यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे.

<><><><><>

नाशिकच्या कुसुमाग्रज नगरीत आयोजित चौथ्या विश्व मराठी संमेलनाचं उदघाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते झालं. राज्य शासनाच्या पुरस्कारांचं वितरण मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी झालं.

सध्या भाषांसमोर अनेक प्रकारची आव्हानं उभी आहेत. कृत्रिम बुध्दीमता हे देखील आव्हान आहे. मात्र, मराठी भाषा, मराठी सारस्वतांचे नवे विचार कृत्रीम बुध्दीमता हिरावून घेऊ शकणार नाही. या काळात देखील अभिजात मराठी टिकूनच राहील, असा विश्वास फडनवीस यांनी यावेळी व्यक्त केला. कृत्रीम बुध्दीमतेचा मराठी भाषेसाठी अनुकूल वापर झाला पाहिजे. जे ग्रामीण साहित्य अनुवादित करण्यासाठी साहित्यिकांकडे पुरेसं बळ नाही त्यांना हे उपयुक्त ठरू शकेल. असं ते म्हणाले. मराठी ही संवादाची, ज्ञानाची, संशोधनाची आणि चरीतार्थाची भाषा झाली पाहिजे, त्यासाठी शासनाचा मराठी भाषा विभाग प्रयत्न करत आहे. आता पाचवं मराठी साहित्य संमेलन विदर्भात, तर त्यानंतरच्या वर्षी परदेशात भरवावं, अशी सूचनाही त्यांनी केली.

यावेळी डॉ. भालचंद्र नेमाडे यांना साहित्य भूषण, श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांना विंदा करंदीकर जीवनगौरव, तर शांतिब्रह्म, गुरूवर्य मारुतीबाबा कुरेकर यांना विश्व मराठी संमलेनाच्या विशेष पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

मंत्री गिरीश महाजन आणि छगन भुजबळ, तसंच संमेलनाचे स्वागताध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे यांच्यासह अन्य आमदार आणि ज्येष्ठ साहित्यिक उपस्थित होते.

**<><><><><>**

महाराष्ट्र सरकार राज्यातल्या खासगी शाळा आणि शिकवणी वर्गातल्या शुल्कावर मर्यादा आणण्यासाठी लवकरच धोरण जाहीर करणार आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज विधानसभेत ही घोषणा केली. येत्या शैक्षणिक वर्षात मराठी शाळांमधली पटसंख्या किमान २५ टक्के वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्य शासन मराठी माध्यमाच्या शाळांकडे विशेष लक्ष देऊन सर्व प्रकारच्या भौतिक सुविधा उपलब्ध करून देत आहे, याखेरीज इतर अनेक उपक्रमही राबवले जात आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

शिक्षणाच्या अधिकाराअंतर्गत प्रवेशासाठीची १ किलोमीटरची मर्यादा, शाळा नसतील तिथं शिथिल करण्याचा विचार करू. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सुविधा वाढवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं आश्वासन त्यांनी दिलं. राज्यात कोणत्याही मराठी माध्यमाच्या शाळा बंद केल्या जाणार नाहीत अशी ग्वाही भुसे यांनी आपल्या विभागाच्या पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेला उत्तर देताना दिली.

यानंतर दोन्ही विभागाच्या पुरवणी मागण्यांसह इतर विभागाच्याही मागण्या सभागृहात मंजूर करण्यात आल्या, त्यानंतर विनियोजन विधेयकही मंजूर करण्यात आलं.

**<><><><><>**

उत्पादन शुल्क घोटाळ्यात दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना दिल्लीतल्या न्यायालयानं दोषमुक्त केलं आहे. सीबीआयनं दाखल केलेल्या आरोपपत्रात ठोस पुराव्याच्या अभावी अनेक विसंगती आढळून आल्याचं विशेष न्यायाधीश जितेंद्र सिंग यांनी म्हटलं आहे. या प्रकरणातल्या इतर २१ आरोपींनाही न्यायालयानं दोषमुक्त ठरवलं आहे.

दरम्यान, या प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयात तात्काळ आव्हान याचिका दाखल केली जाईल, असं सीबीआयनं म्हटलं आहे. तपासातले अनेक पैलू खालच्या न्यायालयानं

लक्षात घेतले नाहीत किंवा ते पुरेसे असल्याचं मानलं नाही, असंही सीबीआयच्या प्रवक्त्यानं सांगितलं.

<><><><><>

अमेरिका आणि इराणमधल्या वाढत्या तणावामुळे आणि विविध क्षेत्रांमध्ये समभागांची विक्री वाढल्यामुळे आज देशातल्या शेअर बाजारांमध्ये मोठी घसरण झाली. भूराजकीय अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर गुंतवणुकदारांनी जोखीम टाळण्याचा मार्ग स्वीकारल्यामुळे सकाळी व्यवहार सुरू झाल्यापासूनच घसरणीचं चिन्हं दिसत होतं. दिवसअखेरच्या शेवटच्या अर्ध्या तासात या घसरणीत वाढ झाली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ९६१ अंकांची घसरण झाली आणि तो ८१ हजार २८७ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३१८ अंकांची घसरण नोंदवत २५ हजार १७९ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

मराठी भाषा गौरव दिन आज साजरा होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. मराठी भाषा गौरव दिवसाच्या निमित्तानं विधान भवनातल्या मध्यवर्ती सभागृहात ‘जावे विनोदाच्या गावा’ या विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनीही या दिनानिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. मराठी भाषा ही धर्म, संप्रदाय आणि जातीच्या पलीकडे जाऊन लोकांना जोडणारी भाषा आहे, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे, ऑस्ट्रेलियात होबार्ट इथे आज झालेल्या दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारताचा ५ गडी राखून पराभव केला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि ५० षटकांमध्ये २५१ धावांच आव्हान यजमान संघासमोर ठेवलं होत. जॉर्जिया वॉलनं ८३ चेंडूंमध्ये केलेल्या १०१ धावांच्या जोरावर ऑस्ट्रेलियाच्या संघानं हे आव्हान पार केलं.

त्यामुळे  तीन सामन्याच्या या मालिकेत आता ऑस्ट्रेलियाचा संघ २-० नं आघाडीवर आहे.

<><><><><>

टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या 'सुपर एट' फेरीत, आज कोलंबोत, इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात लढत सुरु आहे. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा न्यूझीलंडच्या १६ षटकात ४ बाद १३२ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//